वस्तू व सेवाकर विभाग यांच्या आस्थापनेवर राज्यकर अधिकारी गट-ब राजपत्रित संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्र. विकअ १०२५/प्र.क्र.६०/वि.प्र.-२/ १५१५२४७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :- २५ मे, २०२६.**

**वाचा:-** १. शासन आदेश वित्त विभाग क्र.विकवि.१२२३/प्र.क्र.२३२/वि.प्र.२ दि.२४.१२.२०२४
२. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ मधील कलम २० (४)
३. जिल्हा रुग्णालय वाशिम यांचे दि.९.३.२०२४ रोजीचे दिव्यांग प्रमाणपत्र.
४. वस्तू व सेवाकर विभागाचे पत्र क्र. रासआ/मुख्या-४/आस्था-३/रा.अ./ श्री.बागडे/ ब-४२१ दि.१५.०४.२०२६.

**प्रस्तावना :**

वित्त विभागाच्या अधिपत्याखाली वस्तू व सेवाकर विभागातर्गत श्री.प्रदिप अंबादास बागडे, राज्यकर निरीक्षक यांची दि.१९.११.२०१३ रोजी शासन सेवेत नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. बागडे यांचा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दि. ३०.९.२०३४ असा आहे. श्री बागडे, राज्यकर निरीक्षक हे वस्तू व सेवाकर विभाग अकोला येथे कार्यरत असताना त्यांचा दि.१५.०८.२०२३ रोजी अपघात झाला असून त्यांना चलनवलन विषयक मर्यादा आलेल्या आहेत. जिल्हा ग्रामीण रुग्णालय, वाशिम यांच्या Certificate No.: MH०६१०६१९७६०२०४१६८) दि.०९.०३.२०२४ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार त्यांना खालीलप्रमाणे शारिरीक व मानसिक अपंगत्व आले आहे.

(A) He is a case of Locomotor Disability

(B) The diagnosis in his case is Post Head Injury Hemiparesis Left Side

(C) He has ४०%(in figure) Forty percent(in words) Permanent Disability in relation to his Left Sided Lower Limb and Upper Limb as per the guidelines (Guidelines

for the purpose of assessing the extent of specified disability in a person Included under RPWD Act, २०१६ notified by Government of India vide S.O. ७६(E) dated ०४/०१/२०१८) अध्यक्ष वैद्यकीय मंडळ, अकोला यांनी त्यांच्या दि.०७.१०.२०२४ नुसार त्यांना unfit for duty for three months असे प्रमाणपत्र दिले आहे. तदनंतर उपरोक्त संदर्भ क्र.०४ अन्वये वैद्यकिय मंडळ, शासकीय महाविद्यालय, अकोला यांना श्री. बागडे यांच्या दि. ०५.०३.२०२६ रोजी केलेल्या तपासणीअंती दिलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये श्री. बागडे हे He is unfit for duty permanently असे प्रमाणित केले आहे.

श्री.बागडे, राज्यकर निरीक्षक यांची दि.२४.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये राज्यकर अधिकारी पदी पदोन्नती झाली होती. तथापि, श्री.बागडे यांच्या दिव्यांगाबाबतच्या वरील वस्तुस्थितीनुसार ते राज्यकर अधिकारी पदावर काम करण्यास असमर्थ असल्याने त्यांच्यासाठी राज्यकर अधिकारी संवर्गात अधिसंख्य पद निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २० (४) अनुसार श्री.प्रदिप अंबादास बागडे, राज्यकर निरीक्षक यांच्यासाठी " राज्यकर अधिकारी " संवर्गाचे एक अधिसंख्य पद दि. १५.०८.२०२३ पासून ते त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत (दि. ३०.९.२०३४ ) अथवा सदर पद अन्य कारणाने रिक्त होईल, यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच्या कालावधीसाठी वित्त विभागाच्या अधिपत्याखालील वस्तू व सेवाकर विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल. सदर पदावरील खर्च हा वस्तू व सेवाकर विभागाच्या संबधित लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय उच्च स्तरीय सचिव समितीने चक्रिय पध्दतीने दिलेल्या मान्यतेनुसार , दिव्यांग सक्षमीकरण विभाग, सार्वजिक आरोग्य विभाग, वित्त विभाग यांच्या कडून मिळालेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग आ.पु.क कार्यासनाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. "अनौसं ५१/आपुक दि.१२.०२.२०२६ " अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५२५१२४८४६७००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIKRAM NIVRUTTI DHAMAL

Digitally signed by VIKRAM NIVRUTTI DHAMAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=23b2f1b1fd914a87080cb68712db5efd17f65e69284fe1d3274a32de69eb6a25, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=10D36944A4B86EAB516B1B70183709C5FB570CFDF5A52755ADFEF51ED380B836, cn=VIKRAM NIVRUTTI DHAMAL
Date: 2026.05.25 12:49:55 +05'30'

**( विक्रम नि.ढमाळ )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे),मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव ( प्र. सु. ना. आणि सु. ) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
६. सचिव, सार्वजिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, दिव्याग सक्षमीकरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
१०.विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
११.उप सचिव (आपुक) (व्यय-७), वित्त विभाग ,मंत्रालय,मुंबई
१२.महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) व (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर ,
१३.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
( विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई मार्फ़त )
१४.श्री.प्रदिप अंबादास बागडे, राज्यकर निरीक्षक
( विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव,मुंबई मार्फत )
१५.निवडनस्ती.